परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in 9881265102
संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 92 | शनिवार दि. 25 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# गरीब रुग्णांना आता तातडीने मदत!
## मुख्यमंत्री सहायता निधीतून 20 गंभीर आजारांवर उपचार



पुणे : शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी आशेचा किरण ठरत आहे. या निधीच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात 3 हजार 861 रुग्णांना सुमारे 34 कोटी 53 लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून आर्थिक वर्षात 2025-26 मध्ये राज्यातील 40 हजार 776 रुग्णांना 333 कोटी 6 लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. त्यात पुणे जिल्ह्यातील 3 हजार 861 रुग्णांना सुमारे 34 कोटी 53 लाख 99 हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

या निधीतून 20 गंभीर आजारांसाठी मदत केली जाते. त्यात कॉक्लिअर इम्प्लांट (वय वर्ष 2 ते 6), हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस, अस्थिमज्जा, हात आणि गुडघ्याचे प्रत्यारोपण, खुबा प्रत्यारोपण, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशूंचे आजार, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण अशा एकूण 20 आजारांचा समावेश आहे, अशी माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाने दिली आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचे जिल्हास्तरीय कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षांच्या माध्यमातून ऑनलाइन अर्जप्रक्रिया राबविण्यात येत असून, तातडीने अर्जांचा निपटारा केला जातो. त्यासोबतच सामंजस्य करार, निधी संकलनाच्या माध्यमातून समाजातील मदत करणारी रुग्णालये, धर्मादाय रुग्णालये, संस्था, दानशूर व्यक्तींचे सहकार्य घेतले आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत झालेल्या सुधारणांमुळे पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक साहाय्य मिळत आहे.मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाउंडेशन व टाटा मेमोरिअल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत. गरजू रुग्णांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी 18001232211 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे

पान 3 वर

# खरीप पिकविम्याबाबत राज्य सरकार अडचणीत
## हायकोर्टाची तीव्र नाराजी



खरीप पिकविमा प्रकरणी हिंगोलीतील शेतकऱ्यांनी जनहित याचिका दाखल केली होती. प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठात सुनावणी झाली. न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. याप्रकरणी राज्य सरकारच्या भूमिकेवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. तर संबंधित सर्व शासकीय यंत्रणांना शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिले. 17 जून 2026 रोजी सदर जनहित याचिकेवर सुनावणी होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यात एकूण पाच तालुके असून सुमारे 3,25,904 एकर क्षेत्र या योजनेअंतर्गत विमा संरक्षित करण्यात आले आहे तसेच 5,12,094 शेतकऱ्यांनी सदरील विमा संरक्षणासाठी अर्ज दाखल केलेले आहेत. राज्य केंद्र व शेतकरी या सर्वांचा हिस्सा मिळून एकूण रक्कम 3038221775.37 /- HDFC ERGO या विमा

पान 3 वर

# आज ठळक
## केजरीवालांचा आम आदमी पक्ष फुटला; सात खासदारांनी पक्ष सोडला



आम आदमी पार्टी मध्ये मोठी राजकीय उलथापालथ झाल्याची माहिती समोर येत आहे. पक्षातील अंतर्गत मतभेद तीव्र झाल्यामुळे आता पक्षात फूट पडल्याचं स्पष्ट दिसत आहे. या पार्श्वभूमीवर राघव चड्डा यांच्यासह आणखी 7 खासदारांनी भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राघव चड्डा आणि इतर खासदारांनी भाजपात जाण्याचा निर्णय घेतल्याने आप साठी हा मोठा धक्का मानला जात आहे. दिल्लीसह राष्ट्रीय पातळीवर आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पक्षासाठी ही घडामोड महत्त्वाची ठरणार आहे.

दरम्यान, या निर्णयावर आप नेतृत्वाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली, तरी पक्षात अंतर्गत घडामोडी वेगाने सुरु असल्याचं दिसत आहे. दुसरीकडे, भाजपासाठी हा राजकीय फायदा मानला जात असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घडामोडींमुळे राष्ट्रीय राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरु झाली असून, पुढील काही दिवसांत आणखी नेते पक्षांतर करतील का, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## राष्ट्रवादीकडून 7 नावं शॉर्टलिस्ट; सुनेत्रा पवार घेणार उमेदवारीचा 'अंतिम' निर्णय



विधानपरिषदेच्या 9 जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक घोषित झाली आहे. 13 मे रोजी विधान परिषदेसाठी मतदान आणि मतमोजणी होणार आहे. विधानसभेतील सध्याचे पक्षीय बलाबल पाहता सत्ताधारी महायुतीचे पारडे जड दिसत आहे. या 9 जागांपैकी तब्बल 8 जागा महायुती सहज जिंकेल असे चित्र आहे. यामध्ये भाजप 5, शिवसेना 2, आणि राष्ट्रवादी काँग्रेस 1 जागा जिंकू शकते. विधानपरिषदेच्या या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या वाट्याला येणाऱ्या एकमेव जागेवर उमेदवाराची निवड करणे ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पहिली राजकीय कसोटी ठरणार आहे. खासदार पार्थ पवार यांची या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका असून, उमेदवार निवडीत पवार कुटुंबाशी निष्ठा हा निकष असण्याची शक्यता आहे.पक्षातील निर्णय प्रक्रियेवर पवार कुटुंबाचे वर्चस्व असल्याचे दाखविण्याची पुन्हा एकदा संधी मिळणार आहे. त्यासाठी निष्ठावंतांना प्राधान्य दिल्यास तसा संदेश कार्यकर्त्यांपर्यंत पोचवण्याची संधी सुनेत्रा पवार यांना मिळणार आहे. पक्षाध्यक्ष झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांचा हा पहिलाच मोठा राजकीय निर्णय असेल, असे पक्षातील एका मंत्र्याने सांगितले.सुनील

पान 3 वर

# महिला आरक्षणावर फडणवीसांनी भूमिका बदलली, वरिष्ठांच्या दबावाचा परिणाम



नागपूर : नागपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका बदलल्याचा आरोप करत, दिल्लीतील वरिष्ठांच्या दबावामुळे हा बदल झाल्याचा दावा केला. यावेळी आमदार विकास ठाकरे उपस्थित होते.विजय वडेट्टीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांनी 106 व्या घटनादुरुस्तीवर घेतलेली भूमिका पूर्वी स्पष्ट आणि प्रभावी होती, असे सांगितले. मात्र सध्या तेच फडणवीस पक्षश्रेष्ठींच्या दबावाखाली केंद्र सरकारच्या भूमिकेचे समर्थन करत असल्याचा आरोप त्यांनी केला. दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांच्या आदेशामुळे ही कोलांटउडी घेतल्याचेही ते म्हणाले.

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर केंद्र सरकारने अधिसूचना काढण्यास विलंब केल्याचा दावा करत त्यांनी भाजपवर गंभीर आरोप केले. फडणवीसांना वास्तविक माहिती असूनही ते

पान 3 वर

# महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठीत बोललेच पाहिजे, प्रताप सरनाईक यांचा रिक्षा-टॅक्सी चालकांना इशारा




मराठी राज्याची राज्यभाषा आहे ती तुम्हाला आलीच पाहिजे. तुमची अडेलतट्टू भूमिका चालणार नाही. हा सुसंस्कृत महाराष्ट्र आहे असा सज्जड इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी टॅक्सी – रिक्षा चालकांना दिला आहे. येत्या 28 मार्च रोजी या संदर्भात मंत्रालयात बैठकीच आयोजन केले असून सर्वांच्या शंकांचे निरसन केले जाईल असेही सरनाईक यांनी म्हटले आहे.

1 मे पासून राज्यातील रिक्षा – टॅक्सी- उबर-ओला चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधावा लागेल असा निर्णय राज्य सरकार घेत आहे. या संदर्भात सर्व संबंधितांशी संवाद साधण्यासाठी येत्या 28 मार्च रोजी या संदर्भात मंत्रालयात बैठकीच आयोजन केले आहे. या

पान 3 वर

# ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी मे अखेरपर्यंत मुदतवाढ; राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा





मुंबई : बँक खात्याचे ई केवायसी केले नसल्यास शिक्षकांना मे महिन्यामध्ये वेतन मिळणार नाही, असे आदेश शिक्षण विभागाने दिल्याने राज्यातील सर्वच शिक्षकांची धावपळ उडाली होती. शिक्षण विभागाच्या या निर्णयाविरोधात शिक्षकांकडून संताप व्यक्त करण्यात येत होता. विद्यार्थ्यांचे निकाल तयार करायचे, निवडणूक कर्तव्यावर हजर राहायचे की बँके खात्याचे ई केवायसी करण्यासाठी बँकेत जायाचे असा प्रश्न शिक्षकांकडून उपस्थित करण्यात आला होता. त्यामुळे सध्याची परिस्थिती लक्षात घेता शिक्षण विभागाने राज्यातील सरकारी कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ई-केवायसी करण्यासाठी जून 2026 पर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. सर्व

पान 3 वर

# अजितदादांच्या निधनानंतर पवार कुटुंबात अखेर जबाबदाऱ्यांचे वाटप
## सुनेत्रा पवार, जय पवार, पार्थ पवारांकडे कोणती जबाबदारी?



सध्या सर्वच राजकीय पक्षात आगामी निवडणुकांचे वारे वाहताना दिसत आहेत. एकीकडे भाजप, शिवसेना शिंदे गट यांनी आगामी 2029 च्या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. त्यात आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानेही तयारीला सुरुवात केली आहे. ज्येष्ठ नेते अजित

पान 3 वर

# दिव्यांगांना शिवाई बस प्रवासात आरक्षण,आरोग्य सेवेत आरक्षण तसेच दिव्यांगांचे मानधन तात्काळ करण्यासाठी डॉ.संतोष मुंडे यांची परिवहन मंत्री,आरोग्य मंत्री व दिव्यांग कल्याण मंत्री यांना आग्रहाची मागणी

(परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांची प्रत्यक्ष भेट घेवून दिले निवेदन)



परळी (प्रतिनिधी): दिनांक 24 एप्रिल दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान राज्याचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी मुंबई येथे सकारात्मक पाठपुरावा करत राज्याचे दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे,परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी निवेदने दिली.

दिव्यांग पोर्टल सहाय्यक निधीसाठी दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांना निवेदन

तालुका स्तरावर दिव्यांग पोर्टल सहायक निधीसाठी शिबिरे राबविण्यात यावीत, तसेच पोर्टलसाठी लागणारी अनावश्यक कागदपत्रे कमी करून दिव्यांगांना होणारा त्रास

पान 3 वर

# प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांना राज्यस्तरीय 'एकता रंगकर्मी प्रबोधन रत्न पुरस्कार' जाहीर



(छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी): शैक्षणिक, नाट्य, चित्रपट, साहित्य , सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे, नाट्यशास्त्र विभाग, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी यांना यावर्षीचा प्रतिष्ठेचा ' एकता रंगकर्मी प्रबोधन रत्न पुरस्कार 2026'जाहीर झाला आहे. 'जनहित मराठी वृत्तसमूह' आणि 'एकता फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य' यांच्या

पान 3 वर

# परळीत 'जय भीम'च्या जयघोषात सांची बौद्ध विहार दुमदुमला
## सचिनभाऊकागदे यांच्या पुढाकारातून भव्य भीमगीतांचा महासोहळा उत्साहात संपन्न



परळी (प्रतिनिधी) – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त परळी शहर 'जय भीम'च्या जयघोषात दुमदुमले. शिवाजीनगर येथील सांची बौद्ध विहार, थर्मल रोड येथे युवा नेते सचिनभाऊ कागदे यांच्या पुढाकारातून आयोजित भव्य दिव्य भीमगीतांचा सांस्कृतिक महासोहळा 23 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाने सामाजिक समता, बंधुता आणि जागरूकतेचा प्रभावी संदेश दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपविभागीय अधिकारी अरविंदजी लाटकर साहेब, परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ढोणे साहेब, संतोष रोडे उपमुख्याधिकारी परळी नगर परिषद ,कार्यक्रमाचे आयोजक सचिनभाऊ कागदे, देवगिरी वृत्तचे संपादक अनिल सावंत, भीमराव पोळे, तालुकाध्यक्ष शरण मस्के, नगरसेवक कार्तिक कांबळे,यशपाल मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात

पान 3 वर

# संपादकीय

## विश्वविजयाकांक्षिणी...

भारताची पहिली बुद्धिबळ विश्वविजेती बनण्यापासून रमेशबाबू वैशाली आता केवळ एक पाऊल दूर आहे. हे आव्हान खडतर असेल. 'केवळ एक पाऊल' अशा मोजक्या शब्दांत व्यक्त करण्याइतके सोपे तर अजिबातच नाही. कारण समोरील चिनी प्रतिस्पर्धी जू वेनजून गेली काही वर्षे त्या स्थानावर दिमाखात टिकून आहे. बुद्धिबळात जगज्जेता किंवा जगज्जेती बनणे जितके कठीण, त्यापेक्षाही आव्हानात्मक असते कष्टाने प्राप्त केलेले जेतेपद राखणे. भारताचा विद्यमान बुद्धिबळ जगज्जेता दोमाराजू गुकेश सध्या हेच अनुभवतोय. त्याच्या खेळाचा आलेख ऐतिहासिक जगज्जेतेपद पटकावल्यानंतर घसरलेला दिसतो. तसे पाहता कँडिडेट्स स्पर्धा जिंकल्यामुळे वैशाली सध्या विद्यमान विश्वविजेतीसमोर निव्वळ आव्हानवीर ठरते. तरी बुद्धिबळात इथवरचा प्रवासही कमी खडतर नसतो आणि म्हणून महत्त्वाचा मानला जातो. कारण बुद्धिबळात जगज्जेत्याचा आव्हानवीर ठरवण्यासाठी घेतली जाणारी कँडिडेट्स स्पर्धा अत्यंत अवघड मानली जाते. त्याचे कारण म्हणजे एकाहून एक सरस खेळाडू मोठ्या संख्येने यात उतरतात. एकल प्रतिस्पर्ध्यासमोर जगज्जेतेपदाच्या लढतीतील डावपेच निराळे असते नि या स्पर्धेतील डावपेच निराळे. यंदा या स्पर्धेत वैशालीबरोबर दिव्या देशमुख आणि कोनेरु हम्पी यादेखील सहभागी होणार होत्या. परंतु पश्चिम आशियातील अस्थैर्यामुळे आणि स्पर्धास्थळ युद्धग्रस्त टापूजवळील सायप्रस या देशात असल्यामुळे असुरक्षित वाटून हम्पीने माघार घेतली. त्यामुळे वैशाली आणि दिव्या यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. एकूण आठ बुद्धिबळपटूंमध्ये दोघींचे मानांकन सर्वांत खालचे होते. त्यातही वैशाली तर तळाला होती. तरीदेखील आपल्या अधिक मातब्बर बुद्धिबळपटूंना दोघींनी तोडीस तोड टक्कर दिली. वैशालीने तर मोक्याच्या क्षणी विचलित न होता खेळ उंचावून एकाहून एक सरस प्रतिस्पर्ध्याला हरवले. शेवटच्या डावात जिंकणे आवश्यक होते, त्यावेळीही वैशाली निर्धाराने खेळली. तिचा खेळ परिपूर्ण आणि निर्दोष होता अशातला भाग नाही. तसा तो अशा उच्च गुणवत्ता स्पर्धेमध्ये कोणाचाच होत नाही. कारण दडपण हा महत्त्वाचा घटक असतो. याशिवाय प्रतिस्पर्ध्याची तयारी, छुपे डावपेच, अपरिचित चाली खेळून गोंधळात टाकण्याची क्षमता इत्यादी बाबीही प्रभावी ठरतात. जगज्जेते बनलेले किंवा तिथवर पोहोचलेल्या बहुतेक सर्व बुद्धिबळपटूंमधील समान सूत्र हे मानसिक कणखरपणाचे असते.

या कणखरपणाचा पुरावा प्रस्तुत स्पर्धेत वैशालीच्या बाबतीत मांडणे आवश्यक. तिचे पहिले चारही डाव बरोबरीत सुटले. पाचव्या डावात चीनची झू जिनर हिच्याशी ती पराभूत झाली. झू जिनर अग्रमानांकित. स्पर्धा जिंकण्याची तिची दावेदारी सर्वाधिक प्रबळ. तरीदेखील वैशाली न डगमगता खेळत राहिली. एकामागोमाग एक डाव जिंकून आघाडीवरही गेली. पुन्हा झिनर हिच्याशी मुकाबला नि पुन्हा पराभव. यानंतर दोघी समान गुणांवर आल्या होत्या. नंतरच्या दोन डावांमध्ये किमान पराभूत होणार नाही याची खबरदारी तिने घेतलीच. शेवटचा डाव जिंकूनही दाखवला आणि दिमाखात अजिंक्यपद पटकावले. या स्पर्धेत तान झोंग्यी ही चीनची आणखी एक मातब्बर खेळाडू सहभागी झाली होती. ती माजी जगज्जेती, पण तिच्या एका घोडचुकीचा फायदा घेऊन वैशालीने पहिल्या टप्प्यात सनसनाटी विजय मिळवला. झू जिनर आणि वैशालीने या स्पर्धेत प्रत्येकी पाच डाव जिंकले, पण जिथे जिनरने चार डाव गमावले तेथे वैशाली केवळ दोनच डावांत पराभूत झाली. स्पर्धेत शेवटच्या टप्प्यापर्यंत तिचा पाठलाग करणाऱ्या कझाकस्तानच्या बिबिसारा असौबायेवा आणि वैशालीने स्पर्धेत सर्वांत कमी प्रत्येकी दोन डाव गमावले. पण बिबिसाराने चारच डाव जिंकले, तिथे वैशालीचे पाच विजय निर्णायक ठरले. प्रत्येक टप्प्यावर, प्रत्येक फेरीत चढ-उतार अनुभव असतानाही वैशाली निश्चल राहिली. भारताची आणखी एक उदयोन्मुख बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिच्यासमोर ती पहिल्या टप्प्यात हरता-हरता कशीबशी बचावली. दुसऱ्या टप्प्यात तिने दिव्याला हरवले. दिव्या विश्वचषक विजेती आहे नि वैशालीपेक्षा अजून लहान आहे. भविष्यात तिच्यातील कँडिडेट्स जिंकून आव्हानवीर बनण्याची आणि त्याही पुढे जाण्याची क्षमता पुरेपूर आहे.

पण वैशालीच्या या प्रवासाची कथा बुद्धिबळाच्या पटावर काय घडले याविषयी तपशिलापेक्षाही दीर्घ आणि प्रेरक ठरते. तिचा सख्खा धाकटा भाऊ रमेशबाबू प्रज्ञानंद हा अलीकडे अतिशय प्रतिभावान बुद्धिबळपटू. त्याची प्रतिभा तो 12 वर्षे वयाचा असल्यापासूनच दिसू लागली होती. सुरुवातीस प्रज्ञानंद आणि नंतर गुकेश दोघेही षोडशवर्षीय होण्याआधापीसूनच बुद्धिबळविश्वात धुमाकूळ घालू लागले. त्या वेळेपासून पुढे काही काळ वैशालीची ओळख 'प्रज्ञानंदची बहीण' अशीच बनू लागली. हे तिच्यासाठी विलक्षण अन्यायकारक होते. कारण वैशालीची प्रगती आणि प्रतिभा स्वयंप्रकाशी होती. पण प्रज्ञानंदच्या सावलीतून तिला बाहेर काढायला चाहते, विश्लेषक आणि काही प्रमाणात माध्यमे ('लोकसत्ता' नव्हे) तयार नव्हती. तो अन्याय दूर करायचा, तर स्वत: अधिक तेजाने तळपणे हाच मार्ग होता. वैशालीने तो स्वीकारला. तिची वाटचाल स्वतंत्रपणे सुरू झाली. अनेक टप्पे येत गेले. बुद्धिबळातील सर्वोच्च असा ग्रँडमास्टर किताब तिने डिसेंबर 2023मध्ये मिळवून दाखवला. त्यावेळी ती देशातली एकूण 84वी ग्रँडमास्टर, तरी कोनेरु हम्पी आणि हरिका द्रोणवल्ली यांच्यानंतर तिसरीच भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरली होती. वैशाली-प्रज्ञानंद ही ग्रँडमास्टर किताब मिळवणारी जगातली पहिलीच बहीण-भाऊ जोडीदेखील ठरली होती. 'लोकसत्ता'ने 'ग्रँडमास्टर भावंडांत थोरली' या 'अन्वयार्थ'मधून (16 डिसेंबर 2023) तिच्या कामगिरीची दखल घेतली होती. प्रज्ञानंदच्या कौतुकामुळे सुरुवातीस आपल्याला अस्वस्थ वाटे आणि त्यावेळची आपली वागणूक आदर्श नव्हती, असे तिने एका मुलाखतीत प्रांजळपणे कबूल केले होते. माजी जगज्जेता आणि सध्याचा सर्वांत प्रतिभावान बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनला प्रज्ञानंदने मध्यंतरी सातत्याने हरवले; पण तशी कामगिरी वैशालीने प्रज्ञानंदच्या कितीतरी आधी चेन्नईतील एका प्रदर्शनीय डावात करून दाखवली होती. त्या वेळी विश्वनाथन आनंदविरुद्ध जगज्जेतेपदाची लढत खेळण्यासाठी आलेल्या कार्लसनशी काही द्वंद्व करण्याची संधी काही उदयोन्मुख बुद्धिबळपटूंसह वैशालीला मिळाली. तो डाव अर्थातच प्रदर्शनीय स्वरूपाचा असला तरी कार्लसन सहसा पटावर कधीही विरंगुळा म्हणून मोहरी हलवत नाही. प्रज्ञानंदच्या कौतुकात या

# महिला आरक्षण कायदा : सरकारच्या मोर्च्यांची नैतिकता — सखोल विश्लेषण

**डॉ. भारत कऱ्हाड**



महिला आरक्षण हा भारताच्या लोकशाहीतील केवळ एक धोरणात्मक विषय नाही, तर तो सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व आणि सत्तेतील समतोल यांच्याशी थेट संबंधित आहे. या पार्श्वभूमीवर जेव्हा सत्ताधारी पक्ष स्वतःच या कायद्याच्या समर्थनार्थ मोर्चे काढतो, तेव्हा या कृतीची नैतिकता तपासणे आवश्यक ठरते. हा प्रश्न केवळ "मोर्चे काढावेत की नाही" इतकाच मर्यादित नसून, तो लोकशाहीतील भूमिकांची सुसंगती, माहितीची प्रामाणिकता आणि राजकीय उद्देश यांच्या संदर्भात अधिक खोलवर जातो.

लोकशाहीत मोर्चे आणि आंदोलने ही साधने परंपरेने विरोधकांची असतात. कारण विरोधकांकडे थेट निर्णयक्षमता नसते, म्हणून ते जनदबाव निर्माण करतात. परंतु जेव्हा सत्ताधारी— उदा. भाजपा स्वतःच रस्त्यावर उतरतो, तेव्हा हा पारंपरिक समीकरण बदलतो. अशा वेळी प्रश्न उभा राहतो की, हा लोकशाही हक्काचा वापर आहे की लोकमत घडवण्याचा नियोजित प्रयत्न? सत्ताधाऱ्यांकडे विधेयक मंजूर करण्याची, अंमलबजावणीचे आणि वेळापत्रक निश्चित करण्याची सत्ता असताना, आंदोलनाचा मार्ग स्वीकारणे हे काही प्रमाणात "भूमिकेतील विरोधाभास" निर्माण करते.

मात्र, या कृतीला पूर्णपणे अनैतिक म्हणणेही तितकेच सोपे नाही. सत्ताधारी पक्ष स्वतःला केवळ शासनकर्ता (गव्हर्नर) म्हणून नव्हे, तर राजकीय संघटना म्हणूनही पाहतो. त्यामुळे तो जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी, समर्थन मजबूत करण्यासाठी किंवा विरोधकांवर नैतिक दबाव निर्माण करण्यासाठी मोर्चाचा वापर करु शकतो. या अर्थाने, मोर्चे हे लोकशाहीतील अभिव्यक्तीचे वैध साधनच राहतात. पण येथे नैतिकतेचा कस "काय केले" यापेक्षा "कसे आणि का केले" यावर लागतो.

याठिकाणी माहितीच्या सादरीकरणाचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. जर मोर्च्यामध्ये असा प्रचार केला जात असेल की इंडियन नॅशनल काँग्रेस किंवा इतर विरोधी पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध केला, तर हा दावा अर्धसत्य ठरु शकतो. कारण विरोधकांचा आक्षेप हा प्रामुख्याने अंमलबजावणीच्या अटींवर— जसे जनगणना, परिसीमन किंवा ओबीसी प्रतिनिधित्व—आहे. मतभेदांना सरसकट विरोध म्हणून मांडणे हे जनतेसमोर अपूर्ण चित्र ठेवते, आणि याच ठिकाणी नैतिकतेचा प्रश्न तीव्र होतो.

महिला आरक्षणाच्या संदर्भात परिसीमन आणि जनगणना यांसारख्या तांत्रिक अटी जोडल्या गेल्यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणी पुढे ढकलली जाण्याची शक्यता आहे. जर एकीकडे मोर्च्यांद्वारे तातडीचा संदेश दिला जात असेल आणि दुसरीकडे धोरणात्मक पातळीवर विलंब होत असेल, तर या दोन्ही गोष्टींमध्ये विसंगती दिसून येते. ही विसंगती "प्रतीकात्मक राजकारण" म्हणून ओळखली जाते—जिथे कृतीपेक्षा प्रतिमा अधिक महत्त्वाची ठरते.

याचबरोबर, मूळ टीकात्मक लेखात मांडलेले काही मुद्दे—जसे उत्तर-दक्षिण प्रतिनिधित्वाचा असमतोल, जागावाढीबाबतची अनिश्चितता, आणि जातनिहाय जनगणनेचा प्रश्न—हे खरोखरच गंभीर धोरणात्मक मुद्दे आहेत. मात्र त्या लेखात सरकारच्या हेतूंवर थेट आरोप करताना पुराव्याची कमतरता जाणवते. त्यामुळे एकीकडे सरकारच्या मोर्च्यांची नैतिकता प्रश्नांकित होते, तर दुसरीकडे विरोधकांची टीकाही पूर्णतः निष्पक्ष नाही, असे चित्र दिसते.

नैतिकतेचा अंतिम विचार करताना तीन गोष्टी निर्णायक ठरतात: सत्यता, उद्देश आणि सुसंगती. मोर्चे जर तथ्याधारित माहितीवर आधारित असतील, जनहिताच्या उद्देशाने काढले गेले असतील आणि शासनाच्या कृतींशी सुसंगत असतील, तर ते नैतिकदृष्ट्या योग्य ठरतात. परंतु जर ते अर्धसत्यांवर आधारित, राजकीय फायद्यासाठी प्रेरित आणि प्रत्यक्ष कृतीपासून वेगळे असतील, तर त्यांची नैतिकता कमकुवत होते.

निष्कर्षतः, महिला आरक्षणाच्या प्रश्नावर सत्ताधाऱ्यांनी मोर्चे काढणे हे स्वतःमध्ये चुकीचे नाही, परंतु त्यांची नैतिकता ही त्यांच्या पारदर्शकतेवर, प्रामाणिकतेवर आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या बांधिलकीवर अवलंबून आहे. महिला सशक्तीकरणाचा हा ऐतिहासिक मुद्दा जर केवळ राजकीय प्रतिमानिर्मितीचा भाग बनला, तर त्याचा मूळ उद्देश दुय्यम ठरेल. म्हणूनच, या प्रश्नाकडे पक्षीय दृष्टिकोनापलीकडे जाऊन व्यापक सामाजिक आणि लोकशाही मूल्यांच्या चौकटीत पाहणे अधिक आवश्यक आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# ब्रिटिशांनी नोकरशाहीची फौज निर्माण केला

## (25 एप्रिल: भारतीय/ राष्ट्रीय पंचायत राज दिन.)

पंचायत राज व्यवस्था स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील 9वे राज्य आहे. महाराष्ट्राने वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वात पंचायत राज व्यवस्था स्वीकारण्यासाठी समिती गठीत केली होती. त्यानंतर दि.1 मे 1962ला सरकारने महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था लागू केली. त्यानुसार वसंतराव नाईक समितीच्या शिफारसीवरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम 1961 तयार करण्यात आला. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर ज्ञानवर्धक लेख... संपादक.

भारत देशात पंचायत राज व्यवस्था कार्यरत आहे. त्यामुळे देशातील अंतर्गत कारभार पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून चालवण्यात येतो. त्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ही सार्वभौम मानली जाते. या पंचायत राज व्यवस्थेतून ग्रामीण भागातील कारभार सुरु करण्यात येतो. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय पंचायत राज दिन 24 एप्रिलला साजरा करण्यात येतो. काय आहे बरं, पंचायत राज दिनाचा इतिहास? लॉर्ड रिपन या इंग्रज अधिकाऱ्याला भारतीय पंचायत राज व्यवस्थेचा जनक मानले जाते. लॉर्ड रिपनने भारतात 12 मे 1882ला स्थानिक स्वराज्य संस्था सुरु केल्या आहेत. त्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला पंचायत राज हे नाव दिले. त्यानंतर दि.24 एप्रिल 1993ला 73वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राज व्यवस्था अधिकृत करण्यात आली. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी राजस्थानातील नागौर जिल्ह्यातील बगदरी गावात दि.2 ऑक्टोबर 1959 रोजी पहिल्यांदा पंचायत राज व्यवस्था सुरु केली. त्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी दि.24 एप्रिल 2010ला राष्ट्रीय पंचायत राज दिनाची घोषणा केली. तेव्हापासून भारतात 24 एप्रिल हा दिवस राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतात लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्था सुरु केल्यानंतर ही व्यवस्था बळकट करण्यात आली. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी 24 एप्रिल हा दिन राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून जाहीर केला. महाराष्ट्र पंचायत राज व्यवस्था स्विकारणारे 9वे राज्य आहे. पहिल्यांदा राजस्थानने पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. त्यानंतर आंध्रप्रदेशाने 1 नोव्हेंबर 1959ला पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. तर महाराष्ट्राने पंचायत राज व्यवस्था लागू करण्यासाठी वसंतराव नाईक समिती 1960ला नेमली होती. या समितीने आपला अहवाल 15 मार्च 1961ला शासनाला सादर केला होता. दि.1 एप्रिल 1961ला सरकारने हा अहवाल स्विकारला होता. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. त्यानंतर दि.1 मे 1962ला सरकारने महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था लागू केली. त्यानुसार वसंतराव नाईक समितीच्या शिफारसीवरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम 1961 तयार करण्यात आला.

पंचायत राज व्यवस्थेच्या मुळाचा शोध घ्यावयाचा झाल्यास भारतात अगदी प्राचीन काळापासून पंचायती अस्तित्वात असल्याचे दिसते. अर्थात आजच्या पंचायत राज पद्धतीपेक्षा त्याचे स्वरुप खूपच वेगळे होते. गावातील हुशार, अनुभवी, आदरणीय अशी पंचमंडळी असायची. गावातील चावडी सारख्या सार्वजनिक ठिकाणी रोज सकाळी ही मंडळी बसायची आणि गावातील लोकांच्या अडचणी समजावून घेऊन मार्गदर्शन करावयाची. गावामध्ये काही वाद, भांडणे झाल्यास त्यामध्ये लक्ष घालून सोडविणे, गावचा विकास होण्यासाठी योजना आखणे, गावाचा कारभार चालविणे, गावाचा कर गोळा करुन राजाला खंड वसूली देणे इ.कामे ही पंचमंडळी पार पाडीत असत. गावात त्यांना फार मान होता. गावकरी त्यांच्या शब्दाबाहेर जात नसत.

मौर्याच्या काळामध्ये तर त्यांना ग्रामशासनाचा अधिकार होता. व त्या दृष्टीने या पंचायती खूपच विकसित झालेल्या होत्या. सन 800 ते 1000च्या दरम्यान बोल घराण्याच्या इतिहासातील एकल येथील चौदा शिळा खऱ्या ग्रामपंचायतीच्या निर्देशक आहेत. आजच्या ग्रामपंचायती करीत असलेली विविध गाव विकासाची कामे या ग्रामपंचायती त्या वेळी करीत होत्या. ग्रामपंचायतीची निवडणूक दरसाल होत असे व सर्व सभासद लोकनियुक्त असत. त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखरेखीसाठी नेमणूक होई. ग्रामपंचायतीकडे स्वतःच्या निधी असायचा. न्यायनिवाडे ही पंचायत करी, फाशीची शिक्षा क्वचितच अंमलात येई. देवळात नंदादीप लावणे अगर पंचायतीस अमुक इतक्या गाई पुरविणे या गोष्टी शिक्षा म्हणून देत असत.

भारतात अनेक साम्राज्ये आली होती. बाहेरुन आलेल्या मोगलांनी ही पद्धत स्विकारली. भारतासारख्या खंडप्राय खेडयापाड्यात विखुरलेल्या देशाला विकेंद्रित शासनाचीच जरुरी होती. त्यामुळेच ही पद्धत अनेक वर्षे टिकून होती. त्यातूनच खेडी स्वयंपूर्ण बनत होती. ग्रामीण कारागीर, कष्टकरी यांना पोट भरण्याकरीता व्यवसाय मिळत होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ग्रामपंचायतीची पद्धत चोहीकडे चालू होती. तीच रयतेच्या सोयीची वाटल्यावरुन महाराजांनी कायम ठेवली. रयतेला न्याय मिळवण्यासाठी लांब कुठे जावे लागू नये, म्हणून गावातील पंचांनीच फुकट न्याय द्यावा, हे अभिप्रेत होते. छत्रपतीच्या काळात ग्रामपंचायती पूर्वीप्रमाणे चालू होत्या. ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्यांनी मात्र आपापल्या स्वार्थासाठी गावगड्यांची चालू व्यवस्था मोडीत काढून तलाठी पोलीस पाटील यांच्यापासून ते कलेक्टर पर्यंत नोकरशाहीची फौज निर्माण केली. सन 1882 साली लॉर्ड रिपनने मर्यादित स्वरुपात स्थानिक स्वराज संस्थेचा कार्यक्रम अंमलात आणला. परंतु आरोग्य आणि प्राथमिक सोयी सुविधा पुरतेच त्यांचे उद्दिष्ट मर्यादित होते. त्यामध्ये स्वराज्याचा मागमूसही नव्हता. याच काळात तालुका लोकल बोर्ड, जिल्हा लोकल बोर्ड व काही मोठया गावात ग्रामपंचायती स्थापन झाल्या. या स्थानिक स्वराज्य संस्था स्वातंत्र्य प्राप्ती नंतरही काही काळ चालू होत्या.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात देशाच्या पुनुरुत्थापनाचा व नवनिर्माणाचा विचार सुरु झाला. त्यामध्ये गाव विकासाच्या दृष्टीने विचार होणे स्वाभाविक होते. महात्मा गांधींनी स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात खेड्याकडे जाण्याचा मार्ग दाखविला आणि ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली होती. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना नवा मुलभूत आणि व्यापक अर्थ मिळाला. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि घटना समितीची स्थापना झाली. स्वातंत्र्य लढ्यात लोकांनी उराशी बाळगलेल्या ध्येयात ग्राम स्वराज्य हे सूत्र होते. त्यामुळे देशाची घटना होत असताना ग्रामपंचायतीचा स्वतंत्र तिसरा सत्र असावा अशी सूचना मांडण्यात आली. त्या सूचनेला घटना समितीतील काही लोकांनी विरोध केला. भारतीय समाज व्यवस्था जाती व्यवस्थेच्या उतरंडीवरच आधारीत असल्यामुळे तथाकथित उच्च वर्गीय जातींना पंचायत व्यवस्थेत पंच म्हणून स्थान मिळत असे. तसेच गांवातील उच्च जातीय लोकच निर्णय घेण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असत. अशा रितीने या पूर्ण व्यवस्थेमध्ये स्त्रिया आणि तथा कथित खालच्या जातींना कोणतेही स्थान नव्हते. ही व्यवस्था समानतेवर आधारीत नाही असे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांचा या व्यवस्थेला विरोध होता. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या तिसऱ्या स्थराची व्यवस्था अंमलात येण्यासाठी काही काळ थांबावे लागेल, कारण ग्रामपंचायतीचा वापर समाजातील हित संबंधी व श्रीमंत लोक करुन घेतील व सर्व सामान्य लोकांवर व दलीतांवर अन्याय होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. तरीसुद्धा घटना समितीने सामाजिक उद्दिष्ट म्हणून "राज्ये, ग्रामपंचायत संघटीत करतील व त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करण्यास आवश्यक अधिकार देतील" असे चाळीसाव्या मार्गदर्शक सूत्रात नमूद केले. बलवंतराय मेहता अभ्यास गटाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिली पंचवार्षिक योजना अमलांत आणली. शेतकऱ्यांचा आणि खेड्यांतील इतर लोकांचा विकास करुन त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. लोकांचा सहभाग यामध्ये अपेक्षित होता पण या योजनेला म्हणावा तसा लोकसहभाग मिळाला नाही. या कामाची पाहणी करण्यासाठी नियोजन मंडळाने बलवंतराय मेहतांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नेमला. या अभ्यास गटाने आपला अहवाल सन 1957 साली सदर केला. त्यामध्ये पंचायत राज्याची संकल्पना दिशा आणि रचनेच्या दूरगामी व अमुलाग्र बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आणि प्रथमच लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज्याची संकल्पना मांडण्यात आली. राजस्थान सरकारने बलवंतराय समितीच्या सूचना विचारात घेऊन जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीची योजना आखली. दि.2 ऑक्टोबर 1959 रोजी पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन केले आणि देशांत पंचायत राज सुरु झाले, अशी घोषणा केली. त्यानंतर ही व्यवस्था पंचायत राज या नावाने लोकप्रिय झाली. पंचायत राज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर वेगवेगळ्या समित्या वेळोवेळी स्थापन करण्यात आल्या. त्यात श्री.व्ही.टी.कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली 1960 साली समिती नेमण्यात आली. या अभ्यासगटाने काही महत्वाच्या शिफारशी केल्या. कायदयाने ग्रामसभा प्रस्थापित कराव्या व त्यांच्या किमान दोन सभा व्हाव्यात ही महत्वाची शिफारस या अभ्यास गटाने केली. सन 1977 साली अशोक मेहता समिती स्थापन करण्यात आली. प्रत्येक राज्यातील पंचायत राज व्यवस्था त्या त्या राज्याच्या परिस्थितीप्रमाणे वेगवेगळी असू शकेल. आवश्यक वाटल्यास घटनेत दुरुस्ती करुन पंचायत राज व्दारे लोकशाही विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे मत या समितीने मांडले. सन 1985 साली नियोजन मंडळाने ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम परिणामकारक रितीने राबविला जावा म्हणून श्री.जी.व्ही.के.राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीनेही लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असावा म्हणून पंचायत राज व्यवस्थेला महात्वाचे स्थान असावे, अशी शिफारस केली.

महाराष्ट्र शासनानेही पंचायत राज व्यवस्थेच्या यशस्वी परिणामकारकतेसाठी वेळोवेळी अभ्यासगट व समित्यांची स्थापना केली. एस.जी.बर्वे समिती 1968, बोगिरवार समिती 1970, मंत्रिमंडळाची उपसमिती 1980, आणि पंचायत राज व्यवस्थेचे मुल्यमापन करण्यासाठी 1984 साली प्राचार्य पी.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल 1986 साली सादर केला. ही सर्वात अलिकडील समिती असून त्यांच्या शिफारशीच्या आधारे राज्यशासन वेळोवेळी विचार करुन दुरुस्त्या करीत आहे.

### एल.एम.सिंघवी समिती

सन 1984च्या अखेरीस राजीव गांधी यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची सूत्रे स्विकारली. त्यांच्या सरकारने पंचायत राज्य संस्थेला मजबूती प्रदान करण्याच्या उद्देशाने सन 1986च्या जून महिन्यात एल.एम.सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली "लोकशाही आणि विकास कामी पंचायतीचे पुर्नजीवन करण्यासाठी समिती" नियुक्त केली. पंचायत राज संस्थांची सध्याची स्थिती त्यांची आत्तापर्यंतची वाटचाल आणि विकास कार्यातील त्यांची भूमिका इत्यादीचे मूल्यमापन करण्याची तसेच ग्रामीण विकास व राष्ट्रबांधणीच्या कार्यात पंचायत राज्य संस्थांना भरीव योगदान कसे करता येईल याबाबत उपाय सुचविण्याची जबाबदारी सिंघवी समितीवर सोपविण्यात आली होती. एल.एम.सिंघवी समितीच्या बऱ्याचशा शिफारशी यापुर्वीच्या काही समित्यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणेच आहेत. तथापि सिंघवी समितीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारस केली ती म्हणजे "पंचायत राज संस्थांना किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक मान्यता व संरक्षण देण्यात यावे. त्याकरीता भारतीय राज्य घटनेत एक नवे प्रकरण समाविष्ट करण्यात यावे." सिंघवी समितीची ही शिफारस अत्यंत वैशिष्टयपूर्ण मानावी लागेल. भारतात पंचायत राज्याची स्थापना झाल्यानंतर राजकिय नेत्यांनी व राज्यकर्त्यांनी ग्रामीण पुर्नरचनेच्या तसेच ग्रामीण विकासाच्या कार्यात पंचायत राज संस्था महत्त्वाची भूमिका बजावतील म्हणून त्यांना सक्षम बनविण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत, अशा अर्थाचे मत प्रदर्शन केले. 73वी घटना दुरुस्ती करण्यामागे सिंघवी समितीच्या अहवालाचे फार मोठे योगदान आहे, असे म्हटल्यास त्यात वावगे काहीच नाही!

!! पंचायत राज दिनानिमित्त सर्व भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त**

# आमच्या नेत्याला आमदार करा

## बीडमध्ये समर्थकांकडून होतेय मागणी; कोणाची लॉटरी लागणार?

बीड : विधानपरिषदेच्या रिक्त असलेल्या नऊ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु होणार आहे. 30 एप्रिल हा अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असून या नऊ जागांवर अनेकांचे लक्ष लागले आहे. यात बीडचे कार्यकर्ते कसे मागे राहणार? त्यांनी देखील आपल्या नेत्याला आमदार करावे, अशी मागणी करण्यास प्रारंभ केला आहे. याबरोबरच प्रसिद्धी पत्रकातून देखील दावे केले जात असून, यामध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार अमरसिंह पंडित तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्या नावाची चर्चा होत आहे.

विधानसभेत असणाऱ्या संख्याबळानुसार विधानपरिषद निवडणुकीत 9 जागांपैकी 5 जागा भाजपच्या वाट्याला, 2 जागा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला, 1 जागा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादीला आणि महाविकास आघाडीतील तीन पक्षांत मिळून एक जागा मिळण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत भाजप, शिवसेना तसेच राष्ट्रवादीच्या बीडमधील नेत्यांकडून पक्षीय पातळीवर मोर्चेबांधणी सुरु आहे. तर दुसरीकडे आपला नेता या स्पर्धेत मागे राहू अशी काळजी कार्यकर्ते घेत आहेत. यातूनच गेवराईचे माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अमरसिंह पंडित यांना विधान परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियातून व्हायरल होत आहेत.

परंतु राष्ट्रवादीकडूनच विजयसिंह पंडित हे विधानसभेतील आमदार आहेत, त्यामुळे अमरसिंह पंडित यांना संधी मिळू शकेल का, असा देखील प्रश्न उपस्थित केला जात आहे. याबरोबरच गेल्या काही काळापासून सक्रिय राजकारणापासून दूर असलेले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या समर्थकांकडून तर आमदारकी फिक्स असल्याबाबतच्या पोस्ट केल्या जात आहेत. परंतु क्षीरसागर यांना नेमक्या कोणत्या पक्षाकडून संधी मिळणार, हे मात्र गुलदस्त्यात आहे. कारण क्षीरसागर गेल्या अनेक महिन्यांपासून भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा होत्या. त्यांचा हा प्रवेश अद्यापही प्रलंबित राहिलेला असताना आता नव्याने शिवसेना शिंदे गटात प्रवेश आणि आमदार नक्की असल्याचे काही कार्यकर्ते छातीठोकपणे सांगत आहेत.

तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे निष्ठावंत म्हणून ओळखले जाणारे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनाही संधी मिळावी अशी मागणी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून केली जात आहे. शिवसेनेचे बीड जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी याबाबत प्रसिद्धी पत्रक दिले असून अनिल जगताप यांना विधान परिषदेवर संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आता कार्यकर्त्यांच्या मागणीनंतर वरिष्ठ पातळीवर काय निर्णय घेतात आणि बीडमधून कोणाला संधी मिळून आणखी एक विधान परिषदेवरील आमदार बीडला मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

पान 1 वरुन

प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

---------------------------------

कंपनीकडे जमा करण्यात आली असून त्यानुसार संरक्षित विमा रक्कम 17212292067.96/- इतकी आहे. विमा संरक्षित पिकांमध्ये प्रामुख्याने कापूस, सोयाबीन, तूर, मूग व उडीद यांचा समावेश आहे. प्रधानमंत्री फसल बीमा योजना अंतर्गत दुष्काळ व योजनेच्या संबंधित तरतुदीनुसार 25% अग्रीम विमा संरक्षण शेतकऱ्यांना दिलेले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप 2023 चा पिक विमा प्राप्त न झाल्याने हिंगोली येथील अजित मगर व आमदार चंद्रकांत नवघरे यांनी ही जनहित याचिका दाखल केलेली आहे. त्यांच्या वतीने अ‍ॅड. संभाजी टोपे यांनी युक्तीवाद केला.हिंगोली जिल्हाधिकाऱ्यांनी 14 सप्टेंबर 2023 रोजी अधिसूचना काढून विमा कंपनीस बाधित शेतकऱ्यांना 25% आगाऊ रक्कम अदा करण्याचे निर्देश दिले होते. याविरोधात सदर विमा कंपनीने विभागीय आयुक्त यांच्या विभागस्तरीय समितीकडे अपिल दाखल केले. आयुक्तांनी जिल्हाथिकाऱ्यांचा निर्णय कायम ठेवला. या निर्णयाच्या विरोधात विमा कंपनीने राज्यस्तरीय सल्लागार समिती मुंबई येथे अपील दाखल केले असता राज्यस्तरीय समितीने सुद्धा सदरील 25% अग्रीम विमा संरक्षण शेतकऱ्यांना अदा करावे असाच निर्णय घेतलेला आहे.

हिंगोली जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून दुष्काळी परिस्थिती कायम असून खरीप 2023 हंगामात जमिनीतील आर्द्रता कमी असल्याने पिकांचे नुकसान होऊन उत्पादन नगण्य झाले. अशा परिस्थितीत विमा दावे नाकारल्यामुळे शेतकऱ्यांवर गंभीर आर्थिक परिणाम झाला असून विमा कंपनीने भरमसाठ रक्कम जमा करून घेऊन अगदी नगण्य अर्जदारांना पात्र ठरवले व उर्वरित अर्जदारांना कुठलीही सूचना न देता अपात्र घोषित करण्यात आले आहे अशी बाजू याचिकाकर्त्यांनी मांडली.5,12,439 शेतकऱ्यांपैकी केवळ 1,54,469 शेतकऱ्यांनाच पात्र ठरवले व उर्वरित शेतकऱ्यांना कुठल्या कारणामुळे वगळले व वगळल्याची कारणे किंवा नोटीस किंवा त्यांच्या त्रुटींची पूर्तता करण्याबद्दल ची सूचना त्यांना दिली होती का याचा सुद्धा खुलासा शासनाने करावा असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच शेतकर्‌यांना दावे नाकारण्याची कारणे कळविण्यात आली का, तसे असल्यास कोणत्या माध्यमातून, तसेच अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यांसाठी कोणती तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध आहे याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले तसेच शेतकऱ्यांच्या तक्रारी व विमा संबंधित दावे अंतिमतः निकाली काढण्याकरिता कालमर्यादा आहे का याबद्दल सुद्धा न्यायालयाने विचारणा केली.

-----------------------------------

पक्षाच्या दबावामुळे भूमिका बदलत असल्याचा पुनरुच्चार वडेट्टीवार यांनी केला. ही बाब लोकशाहीसाठी चिंताजनक असल्याचेही त्यांनी नमूद केले. असा त्यांचा आरोप आहे होता.106 व्या घटनादुरुस्तीनुसार महिला आरक्षणासाठी प्रथम जनगणना, त्यानंतर मतदारसंघ पुनर्रचना आणि नंतर 33 टक्के आरक्षण लागू करण्याची तरतूद आहे. मात्र ही प्रक्रिया अद्याप पूर्णपणे सुरू करण्यात आलेली नाही, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी हे विधेयक आणले होते, तर पी व्ही नरसिंहराव यांनी ते मंजूर करुन घेतले. त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. भाजपने त्या काळात विरोध केल्याचा उल्लेख करत त्यांनी इतिहासाचा संदर्भ दिला. महिला सक्षमीकरणाबाबत काँग्रेसची भूमिका सकारात्मक असल्याचे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.लोकसभेत विरोधकांनी संविधानावर हल्ला करण्याचा कथित डाव उधळून लावल्यामुळे भाजप जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी मोर्चे काढत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. या मोर्चांमुळे जनतेत रोष निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबईतील एका सुशिक्षित महिलेने भाजपच्या आंदोलनावर टीका केल्याचे उदाहरण त्यांनी दिले. भाजपचा कथित कुटील डाव माध्यमांसमोर आणणे हा या संवादाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेस पक्ष संविधानाची कोणतीही पायमल्ली होऊ देणार नाही, असा पुनरुच्चारही त्यांनी केला.

---------------------------------

निर्णयाला शिवसेनेचे नेते संजय निरुपम आणि वकील गुणरत्न सदावर्ते यांनी विरोध केला आहे. सरकारमधीलच काही घटक या निर्णयाच्या विरोधात बोलत असल्याने विचित्र स्थिती ओढावलेली आहे. या संदर्भात येत्या 28 मार्च रोजी मंत्रालयातील बैठकीत सर्व भागधारकांशी चर्चा केली जाईल आणि त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले जाईल असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यांनी म्हटले आहे. सरनाईक यांनी म्हटले आहे की ज्यांचा ज्यांचा विरोध आहे त्यांच्या शंकाचे निरासण केले जाईल. महाराष्ट्र हे सुसंस्कृत राज्य आहे महाराष्ट्राच्या कायद्याचे पालन सर्वांनी केले पाहीजे.परिवहन मंत्री म्हणून मी कुठलेही नवीन कायदे आणले नाही. जुन्याच कायद्याची अंमलबजावणी करतोय. मराठी ही राज▯ाची राजभाषा आहे. तुम्हाला मराठी आलीच पाहीजे.तुमची अडेलतट्टूपणाची भूमिका चालणार नाही. हा सुसंस्कृत महाराष्ट्र आहे. या संदर्भात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी आक्षेप नोंदवला असल्याचे सांगितले असता त्यावर सदावर्ते यांचा आणि रिक्षाचालकांचा काही संबध नाही असेही सरनाईक यांनी म्हटले आहे. अंजली निरुपम यांचा मला काल फोन आला होता, या संदर्भात त्यांनी मला माहिती विचारली. त्यांनी मला पत्र दिले आहे. मी संजय निरुपम यांच्या मागणीवरून 28 एप्रिलला मंत्रालयात बैठकीचा सुद्धा आयोजन केले आहे.काही लोकांनी सर्वसामान्य रिक्षावाल्यांना भडकवण्याचे काम केले आहे. त्यांना असे सांगितले की तुमचे लायसन्स रद्द होईल, तुमचा परवाना रद्द होईल, तुमचे जे परमिट दिले ते रद्द होईल. माझे हे म्हणणे आहे की 1989 चा हा कायदा आहे. 2019 मध्ये आम्ही सुधारणा केली होती. कालही आम्ही त्यांच्यात सुधारणा करून त्या कायद्यांमध्ये जे काही ओला आणि उबर तसेट रॅपिड टू व्हीलरचे जे प्रवासी आहेत. त्या पॉलिसीमध्ये सुद्धा या कायद्याचे आणि मराठी भाषेची अंमलबजावणी करण्याची सूचना आम्ही मांडली आहे असेही प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

---------------------------------

जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, शालेय शिक्षण विभाग (शालार्थ प्रणाली), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्लित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये, कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्रित मान्यता प्राप्त व अनुदानित महाविद्यालये / संस्था, आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा व संस्था, वैद्यकीय विद्यापीठ उच्च व तंत्र शिक्षण/कौशल्य विकास विभागाच्या अधिनस्त संस्था, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील संस्थाना मे महिन्यांपूर्वी बँक खात्याचे ई केवायसी करण्याचे आदेश सरकारकडून देण्यात आले होते. मात्र राज्यातील सर्व शाळांमधील शिक्षकांवर सध्या निवडणुकीच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, तसेच त्यांच्यावर जनगणनेची जबाबदारीही सोपविण्यात आली आहे.ही जबाबदारी पार पाडताना त्यांना विद्यार्थ्यांचे निकालही वेळेत लावण्याची जबाबदारी आहे. त्यातच सरकारने बँक खात्याचे ई केवायसी करण्याचे आदेश दिल्याने शिक्षकांनी नेमके कोणते काम करायचे, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. सरकारच्या या निर्णयाविरोधात शिक्षकांकडून संताप व्यक्त करण्यात येत होता.

-------------------------

पवार यांच्या निधनानंतर पक्षाची पुढील वाटचाल कशी असणार याबद्दलची नवीन माहिती समोर आली आहे. राजकीय वारसा जपण्यासाठी पवार कुटुंबात जबाबदाऱ्यांचे अधिकृत वाटप करण्यात आले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पक्ष संघटना आणि प्रशासकीय पकड मजबूत ठेवण्यासाठी तीन स्तरीय फॉर्म्युला निश्चित करण्यात आला आहे.अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी एका विमान अपघातात निधन झाले. अजित पवारांच्या निधनामुळे पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी भरुन काढण्यासाठी सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्या खांद्यावर अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. यानुसार राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार आता पक्षाचा मुख्य चेहरा असतील. केवळ मंत्रालयापुरते मर्यादित न राहता, त्या संपूर्ण महाराष्ट्र राज्याचा दौरा करणार आहेत. कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करणे आणि शासकीय योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवणे, हे त्यांच्या दौऱ्यांचे मुख्य उद्दिष्ट असेल.त्यासोबतच अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्याकडे मुंबई या राज्याच्या राजधानीसह देशाची राजधानी दिल्लीची महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांशी समन्वय साधणे. तसेच मुंबईतील पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्यावर त्यांचा भर असणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. तसेच पवारांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या बारामती आणि पुणे ग्रामीण भागाची संपूर्ण धुरा जय पवार यांच्याकडे सोपवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. स्थानिक पातळीवरील जनतेशी संपर्क दांडगा ठेवणे आणि ग्रामीण भागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल, असं बोललं जात आहे. या महत्त्वाच्या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेताना दिसून येत आहे. कौटुंबिक एकजूट दाखवत पक्षाची विस्कळीत झालेली घडी पुन्हा बसवण्यासाठी या तिन्ही नेत्यांनी कामाला सुरुवात केल्याचे समजते.

---------------------------------

कमी करण्यात यावा याबाबत डॉ संतोष मुंडे यांनी दिव्यांग कल्याण विभागाचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची प्रत्यक्ष भेट घेवून निवेदन दिले.निवेदनातील मागणीवर मंत्री अतुल सावे यांनी सकारात्मक प्रतिक्रिया देत त्वरित कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले. तसेच मागील दोन महिन्यांपासून बंद असलेले ₹2500 मानधन लवकरच सुरु होणार असून, 8 ते 15 दिवसांत निधी सुरु होईल असेहि आश्वासन दिले.राज्य परिवहन महामंडळाच्या शिवाई तसेच स्लीपर बस मध्ये दिव्यांगांना आरक्षण मिळावे यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदनतसेच राज्यात सध्या जास्त प्रमाणात चालणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या शिवाई (इलेक्ट्रिक) तसेच स्लीपर बस सेवेमध्ये दिव्यांग बांधवांसाठी आरक्षणाची कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्यामुळे त्यांना प्रवासात खूप अडवाणी येत होत्या यासाठी डॉ. संतोष मुंडे यांनी राज्याचे परिवहन मंत्रीप्रताप सरनाईक यांची प्रत्यक्ष भेट घेवून या सर्व बसेस मध्ये दिव्यांगांना हक्काचे आरक्षण मिळावे अशी मागणी करत निवेदन दिले.

---------------------------------------------

वतीने त्यांच्या अडीच दशकांच्या सेवाव्रताचा हा यथोचित गौरव करण्यात येत आहे.

प्राध्यापक, अभिनेता, दिग्दर्शक, समीक्षक आणि लेखक अशा विविध भूमिकांतून कलेला प्रबोधनाचे अधिष्ठान प्राप्त करून देणाऱ्या डॉ.सिद्धार्थ तायडे यांच्या निवडीची घोषणा एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक अनंत कराड,जनहित मराठीचे मुख्य संपादक के. बी. शेख, कार्यकारी संपादक प्रा. इम्रान शेख आणि एकता फाउंडेशनचे विभागीय अध्यक्ष प्रा. प्रकाश वाकळे,जिल्हाध्यक्ष पु. ना. बारडकर यांनी केली आहे. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि.26 एप्रिल 2026 रोजी दुपारी बारा वाजता साई नाट्यगृह, सेलू जि. परभणी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या निवडीबद्दल प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे यांच्यावर सर्वच स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

-----------------------------------

आले. 'जय भीम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला आणि उपस्थितांच्या मनात अभिमान, आदर व कृतज्ञतेची भावना दाटून आली.

यानंतर भीमगीतांच्या सुरेल मैफलीला सुरुवात झाली. 'काळजावर कोरले नाव' फेम अजय देहाडे यांच्यासह चेतनकुमार चोपडे, सचिन भुईगळ, विजयजी पवार, विकास साळवे या नामवंत गायकांनी आपल्या दमदार आवाजातून भीमगीत व बुद्धगीत सादर करत वातावरण भारावून टाकले. त्यांच्या सादरीकरणातून बाबासाहेबांच्या विचारांची ताकद, संघर्षाची प्रेरणा आणि सामाजिक क्रांतीची जाज्वल्य जाणीव श्रोत्यांच्या मनात खोलवर रुजली.

'काळजावर कोरले नाव', 'लाल दिव्याच्या गाडी झळा', 'माझ्या भीमाच्या नावाचं कुंकू लावीलं रमानं' यांसारख्या एकाहून एक प्रभावी गीतांनी उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. प्रत्येक सादरीकरणानंतर टाळ्यांचा कडकडाट आणि 'जय भीम'च्या घोषांनी कार्यक्रमाला वेगळीच उंची प्राप्त झाली.

समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जोपासना व्हावी तसेच युवा पिढीने गीतांच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार आत्मसात करावेत, या उदात्त हेतूने सचिनभाऊ कागदे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या सांस्कृतिक सोहळ्याने उपस्थितांना प्रेरणा, अभिमान आणि सामाजिक जाणिवेचा नवा ऊर्जादायी अनुभव दिला.

या कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर, बीड, सिरसाळा तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विशेष म्हणजे महिलांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

-उत्कृष्ट नियोजनाने कार्यक्रम ठरला आदर्श

या भव्य सोहळ्यासाठी सचिनभाऊ कागदे यांनी अत्यंत सुयोग्य नियोजन केले होते. ठिकठिकाणी पाण्याची व्यवस्था, शिस्तबद्ध बैठक व्यवस्था आणि नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी मित्रमंडळाचे कार्यकर्ते सतत कार्यरत होते.विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करुनही सचिनभाऊ कागदे यांनी कोणताही बडेजाव न करता साधेपणाने प्रेक्षकांमध्ये बसून संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद घेतला. प्रत्येक बाबीवर बारकाईने लक्ष ठेवत त्यांनी व्यवस्थापनाची उत्तम जबाबदारी पार पाडली. त्यांच्या या साधेपणाने आणि कार्यतत्परतेने उपस्थितांच्या मनावर वेगळी छाप उमटवली. एकंदरीत, सांची बौद्ध विहारातील हा भीमगीतांचा महासोहळा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न ठरता सामाजिक प्रेरणा देणारा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करणारा अविस्मरणीय क्षण ठरला.

----------------------------------

तटकरे यांच्याकडून पुत्र अनिकेत तटकरे, तर प्रफुल्ल पटेल यांच्याकडून निकटवर्तीय माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या उमेदवारीची शिफारस करण्यात आल्याची माहिती आहे. शिवाय दिवंगत बाबा सिद्दीकी यांचे पुत्र आणि माजी आमदार झिशान सिद्दीकी, प्रवक्ते आनंद परांजपे आणि उमेश पाटील यांचीही नावं चर्चेत आहेत.दिवंगत अजित पवार यांचे एकनिष्ठ शिलेदार अमोल मिटकरी हेही पुन्हा उमेदवारी मिळवण्याचा प्रयत्नात आहेत. 2020 मध्ये अजित पवार यांनी अमोल मिटकरी यांना शब्द दिल्याप्रमाणे विधानपरिषदेची उमेदवारी दिली होती. आता मे महिन्यात ते निवृत्त होत आहेत. मात्र प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांचा मिटकरी यांच्या उमेदवारीला विरोध असल्याची चर्चा आहे.यासोबतच पुण्यातील उद्योगपती आणि माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांच्याही नावाची उमेदवारीसाठी चर्चा सुरु आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वी खासदार पार्थ पवार यांची भेट घेतल्याची माहिती आहे. संजय काकडे 2014 मध्ये राज्यसभेवर निवडून गेले होते. युती, मनसे आणि अपक्षांची मोट बांधून काकडे यांनी विजय मिळवला होता.

--------------------

## पान 4 वरुन

पान 4 वरुन

श्री दीपक तांदळे हे केवळ एक प्रशासक नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी मनापासून जपणारे एक प्रेरणादायी नेतृत्व आहे. त्यांच्या दूरदृष्टी, नियोजनशक्ती आणि शिक्षणाबद्दलच्या प्रामाणिक तळमळीमुळे संस्कार प्राथमिक शाळा आज गुणवत्तेचे आणि संस्कारांचे केंद्र म्हणून उभी आहे. शिक्षणात नवनवीन प्रयोग, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबवले जाणारे उपक्रम या सर्वांमधून त्यांच्या विचारांची उंची स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने केवळ शैक्षणिक यश संपादन केले नाही, तर सामाजिक जाणीवांचीही पेरणी केली आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करून त्यांनी "समाजासाठी जगण्याचा" संदेश पुन्हा एकदा अधोरेखित केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास तांदळे, मुख्याध्यापिका सौ माधुरीताई तांदळे मॅडम, शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. शिक्षकांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "त्यांच्या प्रेरणेच्या प्रकाशातच शाळा प्रगतीचा नवा मार्ग शोधत आहे."विद्यार्थ्यांनीही आनंद व्यक्त करत, मिळालेल्या साहित्यामुळे अधिक उत्साहाने अभ्यास करण्याचा निर्धार व्यक्त केला.

एकूणच, हा वाढदिवस केवळ साजरा झाला नाही तर तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारा, समाजभान जागवणारा आणि शिक्षणाचा खरा अर्थ सांगणारा प्रेरणादायी क्षण ठरला!

-----------------------------------------

टक्के आरक्षण मिळणार होते. त्यामुळे संसद आणि विधानसभेत महिलांचे प्रतिनिधित्व वाढवून त्यांना निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळणार होती.मात्र, काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील पक्षांनी ही संधी हिरावून घेतली असा, आरोप मेघना बोर्डीकर यांनी केला. महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार कायमच प्रयत्नशील असते. त्यासाठीच नारीशक्ती वंदन विधेयक संसदेत मांडण्यात आले. परंतु काँग्रेसने नेहमीप्रमाणे महिलांच्या प्रगतीला अडथळा निर्माण करण्याचे काम केले. महिलांचा सन्मान आणि अधिकारांसाठी उभे राहणाऱ्या धोरणांना पाठिंबा देणे आणि महिला विरोधी विचारसरणीला मतदानातून योग्य उत्तर देणे ही काळाची गरज असल्याचे बोर्डीकर म्हणाल्या.

-----------------------------------------

संदर्भात प्रवीण देशमुख यांनी पोलीस स्टेशनकडे कंप्लेंट केली आहे. वारंवार माझ्यावर अन्याय होत आहे. मला मानसिक त्रास देऊन ब्लॅकमेल करण्याचे काम या मायलेकी करत आहे मला खूप मानसिक त्रास होत आहे. मी खूप पैसे यांना दिलेले आहेत, मला न्याय देण्यात यावा अशी -मागणी प्रवीण देशमुख यांनी केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला दि31 मे 2026 रोजी सकाळी 9 वाजता मी माझ्या कामाला कंपनीत गेलो त्यानंतर मी संध्याकाळी कामावरुन साडेसात वाजता घरी आलो त्यावेळेस मला माझी बायको कल्पना प्रवीण देशमुख ही दिसून आली नाही इतरत्र पाहुण्याकडे शोध घेतला तिचा फोनही लावून बघितला मात्र फोन बंद आला होता मी दिनांक 01-04-2026 रोजी वडवणी पोलीस स्टेशनला तक्रार दिली. जवळजवळ एक महिना होत आला तरी माझ्या बायकोचा शोध लागला नाही. माझ्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली असून येथे आठ दिवसात माझ्या बायकोचा शोध न लागल्यास मी आत्महत्या करणार असा इशारा प्रवीण देशमुख यांनी संबंधित खात्याला दिला आहे. सविस्तर वृत्त पुढीलप्रमाणे आहे की, कल्पना प्रवीण देशमुख, हिने संधी साधून तिने घरातील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने घेऊन घर सोडले. ही बाब लक्षात येताच प्रवीण देशमुख यांनी तात्काळ स्थानिक पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन महिलेचा शोध घेऊ असे सांगितले. मात्र अजूनही माझ्या बायकोचा शोध लागला नाही असे प्रवीण देशमुख यांनी दिलेल्या तक्रारीमध्ये सांगितले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वर्षा व्हगाडे मॅडम ह्या करत आहेत.

-----------------------------------

महाविद्यालयातील प्रवेशाचे दिवस आहेत, त्यांना व्हॅलिडीटी का दिली जात नाही? असा सवाल करत जरांगे पाटील यांनी विखे पाटील यांच्यावर टीकेची झोड उठवली.अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार होते, त्याचे काय झाले? फक्त मराठा समाजाची दिशाभूल सरकार आणि ही उपसमिती करत आहे. सरकारनेच काढलेल्या जीआरची अंमलबजावणी उपसमिताला करता येत नसेल तर मग ती काय कामाची? ती नसललेलीच बरी, अशी उद्विग्नता जरांगे पाटील यांनी व्यक्त केली. राज्यात मराठ्यांच्या 58 लाख नोंदी सापडल्या, तुम्ही प्रमाणपत्र किती वाटले? वैधता किती जणांना दिली? असा प्रश्नांचा भडिमार करत जरांगे पाटील यांनी विखे पाटील यांच्या कारभारावर सडकून टीका केली.सातारा संस्थानच्या गॅझेटचे काय झाले, अहवाल तयार होऊन चार महिने झाले आहेत, सरकारला तो अहवाल घ्यायचा नाही का? पंधरा लाख नोंदी त्यात सापडल्या आहेत. 42 लाख मराठा एकट्या पश्चिम महाराष्ट्राचा जातोय आरक्षणात, नाही न्यायचायं तुम्हाला? ईडब्लूएसमधून मुले उपोषणाला बसले आहेत. महावितरण, शिक्षक भरती, पोलीस भरतीतील तरुणांना 2014 पासून नियुक्त्या नाहीत, याकडेही जरांगे पाटील (Manoj Jarange) यांनी उपसमितीचे लक्ष वेधले. सारथीचा निधी थांबला, 80 हजार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती थांबल्या, मग उपसमिती तिथे बसून काय करते? परदेशात गेलेल्या 75 विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थकली आहे. महामंडळाचे पैसे थकले आहेत, असा आरोप करत जरांगे पाटील यांनी उपसमितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहेत.

---------------------------------------

होते, त्यांच्या स्वातंत्र्यावर कशी गदा आणली होती हे सांगितले. तसेच क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे शैक्षणिक कार्य पूर्ण करून संविधानाच्या माध्यमातून महिलांना शिक्षणाचा अधिकार दिला. एवढेच नाही तर जगातील अनेक देशांना मतदानासाठी आंदोलने करावे लागले परंतु बाबासाहेबांनी देशाला संविधान देतानाच महिलांना मतदानाचा अधिकार बहाल केल्याचे सांगितले. हिंदू कोड बिलासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला असा राजीनामा आजच्या पंतप्रधानांनी महिला बिलासाठी द्यावा असे आवाहनही केले. अध्यक्षीय भाषणात अनिताताई रोडे यांनी बाबासाहेबांची जयंती ही नाचूनही साजरी झाली पाहिजे आणि वाचुनही असे सांगितले.यावेळी विशाखाताई घाडगे, रंजनाताई मस्के यांनीही आपले विचार मांडले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रंजनाताई मस्के यांनी तर आभारप्रदर्शन खंडागळे ताई यांनी केले.या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व कार्यक्रम महिलांशी पार पाडला.कार्यक्रमास शहरातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------------------------------------

भट्ट्याला जोडलेल्या सिलेंडरचा मोठा स्फोट झाला.

हा स्फोट इतका भीषण होता की, ज्या माळवदाच्या घरात स्वयंपाक सुरु होता त्या घराला तात्काळ आगीने वेढले. घराला लाकडी माळवद व बांधकाम असल्याने आगीचा भडका उडाला आणि ही आग शेजारील दुसऱ्या घरापर्यंत पसरली. या भीषण आगीत दोन्ही घरातील धान्य, कपडे, भांडी आणि इतर महत्त्वाचे साहित्य जळून खाक झाले आहे. सकाळच्या वेळी झालेल्या या मोठ्या स्फोटाच्या आवाजाने संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले होते. ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र जाधव कुटुंबाचे मोठे आर्थिक आणि मानसिक नुकसान झाले आहे. पत्नीच्या निधनाचे दुःख ताजे असतानाच या आगीत राहते घर आणि संसार देखील उघड्यावर पडल्याने बालासाहेब जाधव यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. महसूल प्रशासनाने या घटनेचा तातडीने पंचनामा करून पीडित कुटुंबाला मदतीचा हात द्यावा अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

---------------------------------------

खोदण्याचे काम सुरु झाले.त्यानंतर नोव्हेंबरमध्ये साठवण टाकी व जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेण्यात आले. गावातील रस्ते खोदून जलवाहिनी टाकण्यात आली. मात्र, दोन वर्षे उलटूनही योजना पूर्णत्वास गेलेली नाही. मार्च अखेरपर्यंत पाणीपुरवठा सुरु होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती. पण ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे काम रखडल्याचा आरोप होत आहे. यामुळे जलजीवन मिशनचे पाणी नक्की कुठे मुरते आहे? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.सन 1986-87 मध्ये जलनिस्सारण विभागातर्फे गावासाठी पाणीपुरवठा योजना मंजूर झाली होती. त्यावेळी जलकुंभ व जलवाहिनीचे काम झाले; मात्र तांत्रिक त्रुटींमुळे गावाला एक वर्षही नियमित पाणी मिळाले नाही. त्यानंतर ही योजना धूळखात पडली. गेल्या 35 वर्षांपासून ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. आता नव्या योजनेचीही तीच अवस्था होत असल्याने नाराजी वाढली आहे.चार कोटी 60 लाख रुपये खर्च करुनही योजना अपूर्ण आहे. त्यामुळे पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. कामही निकृष्ट झाले आहे. प्रशासनाने तत्काळ लक्ष घालून योजना पूर्ण करावी, अन्यथा आंदोलन करू, असा इशारा ग्रामस्थ कपिल अडागळे यांनी दिला. जलजीवन मिशनचे अभियंता ओमकार बीडकर यांनी सांगितले की, गुत्तेदारास वेळोवेळी लेखी पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. तर गुत्तेदार जालिंदर डाबकर यांनी दावा केला की, काम 100 टक्के पूर्ण झाले असून वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे सध्या पाणीपुरवठा सुरु होऊ शकलेला नाही. दरम्यान, सरपंच सुनील तौर यांनी काम संथ गतीने सुरु असल्याची तक्रार करत, हे काम तातडीने पूर्ण व्हावे यासाठी आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे. एकीकडे कोट्यवधींचा निधी खर्च झाला, तर दुसरीकडे महिलांच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा अद्याप उतरलेला नाही-यामुळे टाकरवणमधील जलजीवन योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

--------------------------------

संघटित व्हा, संघर्ष करा" हा मूलमंत्र प्रत्येकाने आचरणात आणला पाहिजे, असे सांगितले. त्यांनी विशेषतः विद्यार्थी आणि तरुण वर्गाला ध्येयवादी बनण्याचे आवाहन करत समाज आणि देशाच्या विकासासाठी पुढाकार घेण्याचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला जिरेवाडी गावच्या पोलीस पाटील सौ. दुर्गा संतोष मुंडे, सरपंच गोवर्धन कांदे, उपसरपंच राहुल कांदे, नगर परिषद कर्मचारी सत्यवान रोडे, विजय कांबळे, बीड डी.सी.सी. बँकेच्या कर्मचारी रुक्मिणी ताई जोंधळे, अलका जगताप, दिशा कांबळे, सोमेश कांबळे, गोविंद कांबळे, बाबासाहेब रोडे, यश रोडे, रोहित साळवे, अशोक मुंडे, अमृत गायकवाड, कोंडीबा रोडे, देवानंद गायकवाड, रखमाजी जगताप, गोविंद गवळी, विठ्ठल गवळी, राजू गवळी, अजय गवळी, राजेभाऊ कांबळे, विजय गवळी, बाबा रोडे, शशिकांत रोडे, सुनील रोडे, धनराज रोडे, संतोष रोडे, प्रवीण रोडे, प्रकाश रोडे, राहुल रोडे आदी मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.एकूणच, जिरेवाडीमध्ये साजरी झालेली ही जयंती केवळ उत्सव न राहता समाजाला दिशा देणारी, प्रेरणा देणारी आणि एकजुटीचा संदेश देणारी ठरली.

---------------------------------

रखुमाई या रचना त्यांनी अनुक्रमे दुर्गा, नंद, हमीर या रागात सादर केल्या. त्यानंतर खमाज रागात झाली संध्या संदेह माझा गेला. तीलककामोद रागात ब्रह्मरस गोडी जयासी फावली, मध्यमग्राम भीमपलास हरी दासाचीये घरी या रचना गाऊन रंग भरला. भिन्न षड्ज रागात ज्ञानेश्वर माऊली हा गजर भावपूर्ण गायला. संत कबीरांची मन लागो मेरो यार फकीरी मे, ही रचना आणि कान्होबा तुझी घोंगडी चांगली

रे ही गौळण अतिशय रंगतदार, भावपूर्ण आणि तयारीने सादर करून रंगतीचा कळस गाठला. रंगलेल्या मैफिलीची सांगता पायाच्या प्रसादे या भैरवीतील अवीट गोडीच्या रचनेने केली. पूर्ण कार्यक्रमाचे संगीत संयोजन पं. यादवराज फड यांचे होते.त्यांना तबला शेखर दरवडे, हार्मोनियम मकरंद खरवंडीकर, मृदंग माणिकराव गरड, यांनी अगदी सवाल जबाब पद्धतीने साथ देऊन कार्यक्रमास चार चाँद लावले,टाळ शिवाजी डाके स्वरसाथ राधाकृष्ण गरड यांनी केली. संस्थानाधीपती एकनाथ महाराज माने, श्रीकांत फड,मच्छिंद्र चव्हाण, बालाजी मोहीते. मदन कदम इत्यादी प्रतिष्ठित कार्यक्रमास उपस्थित होते.

----------------------------------

सहभाग घेणे यामुळे त्यांची ओळख निर्माण झाली आहे.संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न सोडवणे, त्यांच्या हक्कांसाठी लढा देणे तसेच पत्रकारिता क्षेत्र अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत बबनराव वैद्य यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी दिलेल्या निवडपत्रात जैस्वाल यांना आगामी काळात संघटनेच्या कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जैस्वाल यांच्या निवडीमुळे मराठवाडा विभागातील पत्रकारांना एक सक्षम नेतृत्व मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्या कार्यकाळात पत्रकारांचे प्रश्न मार्गी लागतील आणि संघटनेची ताकद अधिक वाढेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. दरम्यान, त्यांच्या निवडीचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत

---------------------------------------

द्वितीय पारितोषिक: दहीटना संघ,तृतीय पारितोषिक: केज संघ,चतुर्थ पारितोषिक: कोठी संघ.दिमाखदार बक्षीस वितरण समारंभ:

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. केज पंचायत समितीचे माजी सभापती श्री. विष्णुभाऊ घुले यांच्या हस्ते विजेत्या संघाला 51,111 रुपयांचे रोख बक्षीस आणि आकर्षक चषक प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना घुले यांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले आणि शिवजयंतीच्या निमित्ताने युवकांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले."खेळामुळे युवकांमध्ये सांघिक भावना आणि शिस्त निर्माण होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अशा स्पर्धांचे आयोजन करणे ही कौतुकास्पद बाब आहे." - विष्णुभाऊ घुले (माजी सभापती, प.स. केज)नियोजनबद्ध आयोजन:ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सोनू सावंत, नाना मुळे, गणेश मुळे, विठ्ठल मुळे,नवनाथ सावंत, विकास मुळे यांच्यासह समस्त उमरी ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले. मैदानाची सजावट, खेळाडूंची व्यवस्था आणि शिस्तबद्ध नियोजनामुळे या स्पर्धेची चर्चा संपूर्ण परिसरात रंगली होती.या स्पर्धेला परिसरातील क्रीडाप्रेमींनी मोठी गर्दी केली होती, ज्यामुळे शिवजयंतीचा उत्साह द्विगुणित झाला.

----------------------------------------

म्हणून उभे राहावे व उज्वल भारत घडवावा असे आवाहन केले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बापू घोलप यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. सुदर्शन अवस्थी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. महेश दाडगे, डॉ राजा आचार्य डॉ अनुरथ चंद्रे डॉ शेळके इत्यादी सर सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.या पदवी प्रदान समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

------------------------------------------

मंदावणे.मांसपेशींतील कडकपणा (रिजिडिटी).संतुलनाचा अभाव व पडण्याची शक्यता वाढणे. चेहऱ्यावर भाव न दिसणे, आवाज मंद होणे यांसह निद्रानाश, बद्धकोष्ठता, लघवीवर नियंत्रण कमी होणे, रक्तदाब अचानक घसरणे, स्मरणशक्ती कमी होणे, औदासिन्यता इत्यादी लक्षणे या आजारात दिसतात.पार्किन्सनचे निदान होण्यासाठी विशिष्ट प्रयोगशाळा चाचणी नाही. याचे निदान मुख्यतः रुग्णाच्या लक्षणांवर व वैद्यकीय तपासणीतून केले जाते. काही प्रकरणांमध्ये एम.आर.आय., डोपामिन ट्रान्सपोर्टर स्कॅन यांचा उपयोग होतो. पार्किन्सनसाठी संपूर्ण इलाज सध्या उपलब्ध नाही, पण औषधोपचारांद्वारे लक्षणांवर नियंत्रण ठेवता येते.

फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, चाल सुधारण्यासाठी व्यायाम, आहार व्यवस्थापन, मनोवैज्ञानिक सल्ला यांचा या व्याधीत मोठा फायदा होतो.हा आजार हळूहळू वाढत जातो. सुरुवातीस लक्षणे सौम्य असतात, पण कालांतराने रुग्णाला स्वतःच्या दैनंदिन कामकाजासाठी मदतीची आवश्यकता भासू शकते. पार्किन्सन पूर्णपणे टाळता येत नाही, पण संशोधन दर्शवते की नियमित व्यायाम, आरोग्यदायी आहार आणि विषारी द्रव्यांपासून दूर राहणे या गोष्टी आजाराचा धोका कमी करू शकतात. याबाबत संशोधन अजूनही सुरु असून भविष्यात या रोगावर अधिक प्रभावी उपचार मिळण्याची शक्यता आहे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.9518551503, 9545615352

परळी संघर्षनेता
हॅलो बीड
शनिवार दि. 25 एप्रिल 2026



# दीपक तांदळे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप;
## शिक्षणातून स्वप्नांना उभारी देणारा प्रेरणादायी दिवस!



परळी (प्रतिनिधी) : श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळेत एक संस्थेचे सचिव श्री दीपक तांदळे यांचा हृदयाला स्पर्श करणारा वाढदिवस साजरा झाला. सचिव श्री दीपक तांदळे यांच्या





वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून "सेवेतील आनंद" हा खरा उत्सव विद्यार्थ्यांसमोर साकारला गेला.

या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरात केवळ आनंदच नाही, तर शिक्षणाबद्दल नवी उमेद आणि प्रेरणेची एक सुंदर लहर निर्माण झाली. छोट्या-छोट्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि डोळ्यांत दिसणारी चमक हाच या वाढदिवसाचा खरा उत्सव ठरला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी श्री दीपक तांदळे यांना मनापासून शुभेच्छा देत कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. "विद्यार्थ्यांना योग्य साधने मिळाली, तर त्यांच्या स्वप्नांना नवे पंख मिळतात," या उदात्त विचारातून हा उपक्रम साकार झाला. पान 3 वर

# '...ही महिलांची संधी काँग्रेस अन् इंडिया आघाडीतील पक्षांनी हिरावून घेतली!'; मेघना बोर्डीकरांचा गंभीर आरोप



काँग्रेसनं नेहमीप्रमाणे महिलांच्या प्रगतीला अडथळा निर्माण करण्याचे काम केले आहे. महिलांचा सन्मान आणि अधिकारांसाठी उभे राहणाऱ्या धोरणांना पाठिंबा देणे आणि महिला विरोधी विचारसरणीला मतदानातून योग्य उत्तर देणे ही काळाची गरज आहे. काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे महिला विरोधी असल्याचे उघड झाले आहे.

परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी हे पक्ष पुरोगामी असल्याचे सांगतात, फुले- शाहू आंबेडकर यांच्या नावाचा केवळ वापर करतात, असा आरोप केला. नारीशक्ती विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेससह इंडिया आघाडीचा खरा चेहरा या निमित्ताने उघड झाला आहे. काँग्रेसने नारीशक्ती विधेयकाला केलेल्या विरोधाचा निषेध म्हणून लवकरच परभणीत भाजपाच्या वतीने आक्रोश मोर्चा काढणार असल्याचेही बोर्डीकर यांनी जाहीर केले.काँग्रेस पक्षाने नारी शक्ती वंदन विधेयकाला विरोध करून आपला महिला विरोधी दृष्टिकोन पुन्हा एकदा स्पष्ट केला आहे. या विधेयकामुळे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांना 33 पान 3 वर

# प्रवीण देशमुख यांची पत्नी घरातून रोख रकमेसह दागिने घेऊन फरार
### आठ दिवसात शोध न लागल्यास आत्महत्या करणार- प्रवीण देशमुख



वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातीलश लऊळ न 2 हल्ली मुक्काम वडवणी एसबीआय बँकेच्या समोर येथे राहत असलेले प्रवीण देशमुख यांच्या पत्नी कल्पना राजाराम तनपुरे माहेरकडील नाव यांनी घरातील रोख रक्कम व दागिने घेऊन फरार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.प्रवीण देशमुख हे चाकरवाडी मध्ये शिवपुराण कथेसाठी गेले असता यावेळी घरात कोणी नसताना यावेळी त्यांच्या पत्नी यांनी घरातील साहित्य संसार उपयोगी साहित्य व घरातील 75 हजार रुपये घेऊन त्या आपल्या

माहेरी जिंतूर या ठिकाणी घेऊन गेल्या. प्रवीण देशमुख हे चाकरवाडी वरून आपल्या गावी आले असता त्यांना घरामध्ये काही वस्तू नसल्याचे आढळून आले आहे. प्रवीण देशमुख यांच्या पत्नी गेल्या दोन ते तीन दिवसांपूर्वी पैसे घेऊन फरार झाले आहेत. या पान 3 वर

# मराठा समाजात भांडण लावण्यासाठी राधाकृष्ण विखे पाटलांना उपसमितीचे अध्यक्ष केले का? जरांगे पाटलांचा आरोप




राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासारखा खमक्या माणूस मराठा आरक्षण उपसमितीचा अध्यक्ष झाला तेव्हा आम्हाला आनंद झाला होता. ते मराठा समाजाचे नुकसान होऊ देणार नाहीत, हैदराबाद गॅझेटनूसार नोंदी शोधून कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करतील, असा आम्हाला विश्वास होता. पण विखे पाटील नेमके उलट वागायला लागले आहेत, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला.शिंदे समितीची मुदत संपली, पण या समितीला मुदतवाढ देण्याची आठवण उपसमितीला नाही, समिती झोपा काढते का? फक्त सरकारच्या पैशाची उधळपट्टी सुरु आहे. हैदराबाद गॅझेट लागू का करत नाही? ही उपसमिती फक्त मराठा समाजामध्ये भांडण लावण्यासाठी आहे का? मराठवाड्यातील अभ्यासक आणि आमच्या लेकरांच्या अनेक समन्वयकांनी उपसमितीची बैठक घ्या, अशी मागणी विखे पाटलांकडे केली. पण ते आमची बैठक घेत नाही आणि काही विकृत लोकांना निमंत्रित म्हणून बोलावून त्यांच्याशी चर्चा करतात, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला.विखे पाटील (Radhakrishn Wikhe-patil) हे बैठकांचे फोटो टाकून सरकारच्या पैशाची उधळपट्टी करत आहेत. त्यांना मराठा समाजाचे प्रश्न सोडवायचे नाहीत, तर समाजामध्ये भांडण लावायचे आहे, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. शिंदेंच्या काळात कुणबी दाखले दिले जात होते, मग आता का मिळत नाहीत? जून महिना जवळ आला आहे, आमच्या गोरगरिबांच्या पान 3 वर

# मनुस्मृतीने नाकारलेले हक्क संविधानाने महिलांना बहाल केले - वैशाली डोळस





परळी प्रतिनिधी. धर्मव्यवस्थेच्या नावाखाली महिलांचे जे हक्क मनुस्मृतींने नाकारले होते ते हक्क आणि अधिकार देशातील तमाम महिलांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून बहाल केले असे प्रतिपादन एडवोकेट वैशाली डोळस यांनी केले. त्या विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान प्रसंगी बोलत होत्या.

शहरातील रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील मैदानात काल रात्री 8 वाजता छत्रपती संभाजीनगर येथील अडवोकेट वैशाली डोळस यांचे मनुस्मृतीवर आधारित हिंदू राष्ट्र आम्हाला मान्य नाही या विषयावर रात्री 8 वाजता व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिताताई विलास रोडे या होत्या. तर विशाखाताई घाडगे, रंजनाताई मस्के, खंडागळे ताई आदी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी आपल्या व्याख्यानात अडवोकेट वैशाली डोळस यांनी भारतीय महिलांना मनुस्मृतीने कसे जखडून ठेवले पान 3 वर

# पत्नीच्या निधनानंतर दशक्रिया विधीचा स्वयंपाक करतांना सिलेंडरचा स्फोट, दोन घरे जळून खाक
### परिसरात मोठी खळबळ उडाली.



अंबाजोगाई : गोविंद खरटमोल

अंबाजोगाई तालुक्यातील पट्टीवडगाव येथे आज सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली. पत्नीच्या निधनानंतर दहाव्याच्या विधीसाठी स्वयंपाक सुरु असतानाच ही दुर्घटना घडली. या आगीत दोन घरे आणि घरातील संपूर्ण संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पट्टीवडगाव येथील रहिवासी बालासाहेब जाधव यांच्या पत्नी पार्वतीबाई जाधव यांचे 12 एप्रिल 2026 रोजी कॅन्सरच्या आजाराने निधन झाले होते. आज त्यांच्या निधनानंतरचा दहाव्याचा कार्यक्रम करण्यात येत होता. या कार्यक्रमासाठीच सकाळपासून स्वयंपाकाची लगबग सुरु होती. स्वयंपाक सूर असतानाच सकाळी 9:30 च्या सुमारास गॅस भट्ट्याने अचानक पेट घेतला आणि काही वेळातच पान 3 वर

# पाण्यासारखा पैसा खर्चूनही भटकंतीची वेळ



टाकरवण : माजलगाव तालुक्यातील टाकरवण गावासाठी केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेल्या तब्बल 4 कोटी 60 लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम अद्याप अपूर्णच असून, ग्रामस्थांना आजही पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. मोठा निधी खर्चूनही गावकऱ्यांना पाणी न मिळाल्याने संताप व्यक्त होत आहे.

टाकरवण हे तालुक्यातील महत्त्वाचे गाव असले तरी रस्ता व पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांपासून गाव वंचित राहिले आहे. दरवर्षी फेब्रुवारीपासूनच पाणीटंचाईची झळ बसत असल्याने ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर जलजीवन मिशन अंतर्गत गावासह वाडी, वस्ती व तांड्यांसाठी निधी मंजूर झाला. मे 2023 मध्ये गोदावरी पात्रात विहीर पान 3 वर

# जिरेवाडीमध्ये ज्ञानसूर्याचा तेजोमय उत्सव : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 135वी जयंती उत्साहात साजरी



परळी (धनंजय माने )जिरेवाडी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न, ज्ञानसूर्य, युगपुरुष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135वी जयंती अत्यंत हर्षोल्हासात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात गावचे सरपंच गोवर्धन कांदे यांच्या हस्ते झेंडावंदनाने झाली. यावेळी जयंती समितीचे अध्यक्ष सुनील व्हावळे आणि उपाध्यक्ष प्रमोद रोडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे पार पडले, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष भव्यता प्राप्त झाली.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. दशरथ वैजनाथ रोडे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा उजाळा देत "शिका, पान 3 वर

# पं. यादवराज फड यांच्या गायनात परंपरा आणि आधुनिकतेचा संगम




परळी - संत नारायणबाबांच्या 69 व्या पुण्यतिथीनिमित्त वांगी संस्थानने आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात किराणा घराण्याचे प्रख्यात गायक आणि प्रतिभावंत संगीतकार पं.यादवराज फड यांचा " भक्ती - स्वरगंध " हा अभंगवाणीचा अत्यंत श्रवणीय असा अभूतपूर्व रंगलेला कार्यक्रम ऐकून वांगीकर जाणकार रसिकांना पर्वणीच मिळाली.

पं. यादवराज फड यांनी कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पंचपदीने केली. त्यात अलंकापूरी पुण्यभूमी पवित्र हे ईश स्तवन, जय रामकृष्ण हरी, रुप पहाता लोचनी , जय जय विठ्ठल पान 3 वर

# लोकशाही पत्रकार संघाच्या मराठवाडा सचिवपदी पवनकुमार जैस्वाल यांची निवड

• लोकशाही पत्रकार संघाच्या मराठवाडा सचिवपदी पवनकुमार जैस्वाल यांची निवड



परळी वै. ता. 24 प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पवनकुमार श्रीरामजी जैस्वाल यांची मराठवाडा विभागीय सचिवपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील सक्रिय कार्य, सामाजिक बांधिलकी आणि विविध संघटनांमधील योगदान लक्षात घेऊन ही निवड करण्यात आल्याचे संघाच्या निवडपत्रातून स्पष्ट करण्यात आले आहे.

पवनकुमार जैस्वाल हे बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील विवेकानंद नगर, धरणीकर गल्ली येथे वास्तव्यास असून त्यांनी दीर्घकाळापासून पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. ग्रामीण भागातील प्रश्नांना वाचा फोडणे, सामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणे तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये पान 3 वर

# उमरी/सावंतवाडी प्रीमियर लीगवर 'यजमान' उमरी संघाचेच वर्चस्व; दहीटना उपविजेता!
### विष्णुभाऊघुले यांच्या हस्ते 51,111 रुपयांचे प्रथम पारितोषिक प्रदान




प्रकाश मुंडे / केज तालुका प्रतिनिधी अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून उमरी/सावंतवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'प्रीमियर लीग' क्रिकेट स्पर्धेचा थरार नुकताच संपन्न झाला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात यजमान उमरी/सावंतवाडी संघाने आपले वर्चस्व सिद्ध करत प्रथम क्रमांकाच्या मानाच्या करंडकावर नाव कोरले.

विजेते संघ आणि पारितोषिके:

स्पर्धेतील चुरस शेवटच्या चेंडूपर्यंत कायम होती. विविध संघांच्या कसून लढतीनंतर खालील संघांनी यश संपादन केले:

प्रथम पारितोषिक (₹51,111): उमरी/सावंतवाडी संघ, पान 3 वर

# सेल्फीच्या नादाने पिंडालाही कावळा शिवेना- कवी भागवत मसणे
### नवगण महाविद्यालयात पदवी प्रदान कार्यक्रम उत्साहात संपन्न

परळी वैजनाथ : येथील नवगण महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कला, वाणिज्य व बीसीए शाखेतील विद्यार्थ्यांसाठी पदवी प्रदान समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे होते. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, प्रख्यात कवी व साहित्यिक श्री. भागवत मसणे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे, डॉ. मधुकर आघाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कवी भागवत मसणे यांनी "सेल्फीच्या नादाने पिंडालाही कावळा शिवेना" या प्रभावी वाक्याच्या माध्यमातून आधुनिक तरुणाईच्या बदलत्या जीवनशैलीवर भाष्य केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत जीवनमूल्यांची जपणूक करावी, असे आवाहन केले. तर डॉ सुधाकर गुट्टे यांनी पदवी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक पान 3 वर

# पार्किन्सन रोग : मेंदूचा न्यूरोडिजेनेरेटिव्ह आजार- डॉ.जगदीश टेकाळे



बीड : पार्किन्सन या आजारात रुग्णाला हालचाल, संतुलन व समन्वय राखण्यात अडचणी येतात. पार्किन्सन हा आजार बहुदा वयोमानानुसार वाढत जातो आणि पुरुषांमध्ये त्याची शक्यता स्त्रियांपेक्षा थोडी जास्त असते, असे काही अभ्यासांमधून दिसून आले आहे.

या रोगात मेंदूतील सबस्टॅन्शिया नायग्रा नावाच्या भागातील डोपामिन निर्मिती करणाऱ्या पेशी नष्ट होतात. डोपामिन हे एक न्यूरोट्रान्समीटर असून, मेंदूतील सिग्नल्सची देवाणघेवाण योग्य पद्धतीने व्हावी यासाठी आवश्यक असते. डोपामिनची पातळी 60 ते 80 टक्क्यांच्या खाली गेली की, पार्किन्सनची लक्षणे प्रकट होऊ लागतात.

प्रमुख लक्षणे : हालचालींचा वेग पान 3 वर